


# ॥ ज्योतिर्मय ॥

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ४१ वा ❑ शुक्रवार दि.१४ मार्च २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


**विशेष लेख...**

## भारत मॉरिशस द्विपक्षीय संबंधांना सामरिक भागीदारीचा दर्जा

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

मागील दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोनदा मॉरिशसचा दौरा केला. २०१५ नंतर मोदींचा हा दुसरा मॉरिशस दौरा . हिंद महासागरात स्थित मॉरिशस हा भारताचा एक महत्त्वाचा शेजारी देश आहे. दोन्ही देशांमधील विशेष संबंधांचे एक प्रमुख कारण म्हणजे मॉरिशसच्या १२ लाख लोकसंख्येपैकी सुमारे ७०% लोक भारतीय वंशाचे आहेत.

भारत आणि मॉरिशसमधील संबंधांचा इतिहास खूप जुना आहे. १९४८ मध्ये स्वतंत्र भारताने ज्या पहिल्या देशांशी राजनैतिक संबंध प्रस्थापित केले त्यापैकी मॉरिशस हा एक होता. १९६८ मध्ये ब्रिटनपासून स्वातंत्र्य मिळाल्यापासून, मॉरिशसवर प्रामुख्याने दोन प्रमुख राजकीय घराण्यांचे राज्य आहे – रामगुलाम (सीवूसागुर रामगुलाम आणि त्यांचा मुलगा नवीन रामगुलाम) आणि जुगनाथ (अनिरुद जुगनाथ आणि मुलगा प्रविंद).

हिंद महासागर स्थित मॉरिशसशी सामायिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी व द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने मोदींनी मॉरिशसचा दौरा केला.

भारत आणि मॉरिशसने द्विपक्षीय संबंधांना सामरिक भागीदारीचा दर्जा देण्याचा या यात्रेतून जाहीर करण्यात आला. मुक्त, खुला, संरक्षित आणि सुरक्षित हिंदी महासागर याला भारत आणि मॉरिशसचे समान प्राधान्य आहे. दोन्ही देशांतील सामरिक भागीदारीमध्ये सागरी सुरक्षा आणि संरक्षण सहकार्य हे महत्त्वाचे भाग असल्याचे दोन्ही नेत्यांनी मान्य केले आहे. मॉरिशसच्या विशेष आर्थिक क्षेत्रांच्या (ईईझेड) सुरक्षेसाठी पूर्ण सहकार्य देण्यास कटिबद्ध असल्याचे उभय देशांनी मान्य केले.

आपल्या मॉरिशस दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दक्षिणेकडील देशांच्या (ग्लोबल साउथ) विकासाचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट सर्वांसमोर ठेवले. या दौऱ्यात दोन्ही देशांत आठ वेगवेगळे करार करण्यात आले.

हिंदी महासागरात चीनचा वाढता वावर पाहता मॉरिशसबरोबरील संबंधांना भारताने महत्त्व दिल्याचे मानले जात आहे. दोन्ही देशांत सीमापार व्यवहार करताना राष्ट्रीय चलनाचा वापर, समुद्रातील माहितीचे आदानप्रदान करणे, पैसा गैरव्यवहाराला संयुक्तपणे सामोरे जाणे आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांमध्ये (एमएसएमई) सहकार्य वाढविणे अशा विविध क्षेत्रांचा करारामध्ये समावेश आहे.

हिंद महासागर क्षेत्रात चीनची वाढती उपस्थिती भारतासाठी चिंतेचा विषय बनली आहे. म्हणूनच तो मॉरिशससारख्या बेट देशांसोबत एकत्र काम करू इच्छितो. विशेषतः मॉरिशसला गेल्या वर्षी विनाशकारी चिडो चक्रीवादळाचा सामना करावा लागला, ज्याचा विशेषतः अगालेगा शहरावर परिणाम झाला. भारताने आपल्या नौदल मालमत्तेची जमवाजमव करण्यात आणि मदत आणि मदत साहित्य पोहोचवण्यासाठी अगालेगा येथे निर्माण केलेल्या सुविधांचा वापर करण्यात यश मिळवले. या सुविधांमुळे मॉरिशसला सागरी देखरेख, गस्त घालण्यास आणि त्याच्या ब्लू इकॉनॉमी इकोसिस्टमच्या मालमत्तेचे चाचेगिरी, ड्रग्ज आणि मानवी तस्करी आणि त्याच्या विशाल विशेष आर्थिक क्षेत्रासारख्या आव्हानांपासून संरक्षण करण्यास मदत झाली आहे.

मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर मोदी यांनी 'ग्लोबल साउथ'च्या विकासाचे नवे उद्दिष्ट मांडले. त्याला 'म्युच्युअल अँड होलिस्टिक ॲडव्हान्समेंट फॉर सिक्युरिटी अँड ग्रोथ ॲक्रॉस रिजन्स' अर्थात 'महासागर' असे नाव दिले. हिंदी महासागरात चीनचा सातत्याने प्रभाव निर्माण करण्याच्या धोरणाच्या पार्श्वभूमीवर या नव्या धोरणाला महत्त्व आहे. मोदींनी २०१५मध्ये मॉरिशस भेटीत 'सिक्युरिटी अँड ग्रोथ फॉर ऑल इन द रीजन' अर्थात 'सागर' या धोरणाची घोषणा केली होती.

पंतप्रधान मोदींनी विविध विकासकामांचीही या वेळी घोषणा केली. मॉरिशसचे ५० कोटी रुपयांचे विविध विकास प्रकल्प राबविले जाणार आहे. अटलबिहारी वाजपेयी लोकसेवा आणि नवनिर्मिती संस्था उभारणीसाठीही दोन्ही देशांनी या वेळी कटिबद्धता व्यक्त केली.

१९६५ मध्ये मॉरिशसच्या स्वातंत्र्यानंतर, ब्रिटनने हिंदी महासागरातील चागोस द्वीपसमूह मॉरिशसपासून वेगळे केले. तथापि, मॉरिशस अजूनही बेटावर आपला हक्क सांगतो.

हिंद महासागरातील चागोस द्वीपसमूहावर यूकेसोबत परस्पर फायदेशीर करार करण्यासाठी मॉरिशसच्या प्रयत्नांना भारत पाठिंबा देत आहे.गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये, ब्रिटनने एका ऐतिहासिक करारानुसार अर्ध्या शतकाहून अधिक काळानंतर चागोस द्वीपसमूहाचे सार्वभौमत्व मॉरिशसला देण्याचा निर्णय जाहीर केला.

मोदींना मॉरिशसचा सर्वोच्च सन्मान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बुधवारी मॉरिशसच्या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 'द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड ऑफ द इंडियन ओशन' असे या पुरस्काराचे नाव आहे. मॉरिशसचे अध्यक्ष धरम गोकुळ यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्काराने सन्मानित होणारे मोदी हे पहिले भारतीय नेते आहेत.

# शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, स्थापत्य विभागात महिला दिन उत्साहात साजरा

## सीमा गाडेकर यांचे महिला सक्षमीकरणासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन

**छत्रपती संभाजीनगर** – जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दिनांक १२ मार्च २०२५ रोजी शासकीय तंत्रनिकेतन, स्थापत्य विभागात महिला दिनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी महापारेषण विभागाच्या उपकार्यकारी अभियंता सीमा गाडेकर खंडेलवाल या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या त्यांनी विद्यार्थिनींना सक्षम होण्यासाठी व जीवनात यशस्वी वाटचाल करण्यासाठी महत्त्वाचे कानमंत्र दिले.



सीमा गाडेकर यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून स्त्री सक्षमीकरण, शिक्षणाचे महत्त्व, आत्मनिर्भरता, नोकरीतील आव्हाने व सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकला. त्यांनी विद्यार्थिनींना प्रबोधन करताना सांगितले की, फक्त डिप्लोमा शिक्षणावरच न थांबता पुढे डिग्रीचे शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहणे आणि स्वावलंबी बनणे गरजेचे आहे. तसेच महाविद्यालयीन जीवन जगताना आकर्षणाला प्रेम समजून आपल्या आयुष्याचा शिक्षणाचा व उभारीचा असा महत्त्वाचा वेळ वाया घालवू नये, आपल्या आई–वडिलांनी ज्या विश्वासाने आपल्याला या शहरात पाठवलेले आहे त्यांच्या विश्वासाला तडा जाईल असं न वागता शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे व आपलं ध्येय साध्य करावे... तुम्ही यशाची इतकी उत्तुंग शिखरे गाठा की त्यांना तुमचा आई–बाबांना तुमचा अभिमान वाटला पाहिजे तसेच... तुम्हाला काही त्रास होत असेल तर तुमच्यावर अन्याय होत असेल तर अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे गरजेचे आहे....

महाविद्यालयीन जीवनात मुलांसोबत मैत्री करताना स्वतःच्या मर्यादा जपाव्यात तसेच पुढे नोकरी करताना सहकाऱ्यांशी मर्यादित प्रकारे आपली वर्तणूक ठेवावी असे त्यांनी स्पष्ट केले. सध्या वाढत असलेल्या आत्महत्येच्या घटनांवर बोलताना त्यांनी तरुण पिढीला महत्त्वाचा संदेश दिला की, अपयश आलं म्हणून आयुष्य संपवण्याचा विचार करू नये, तर आपल्या पालकांशी, भावंडांशी किंवा जवळच्या मित्रमैत्रिणींशी मन मोकळं करावं. एखाद्या क्षेत्रात तुम्हाला यश आलं नाही म्हणून त्यावर आत्महत्या हा कधीच पर्याय नसतो, आयुष्य एकदाच मिळतं! तेव्हा ते शुल्लक कारणासाठी न संपवता.. अपयश पचवायला शिकलं पाहिजे आणि त्यातून नवीन धडा घेऊन नव्या जिद्दीने आणि जोमाने प्रयत्न करायला हवेत तुम्ही जर प्रामाणिक कष्ट केले तर काय यशस्वी होण्यापासून कोणीच आडवू शकत नाही... फक्त स्वतःवरील आत्मविश्वास डगमगू देऊ नका मग पहा यश तुमचंच आहे. तसेच सीमा गाडेकर यांनी घटस्फोटाच्या वाढत्या प्रमाणावर आणि तरुण पिढीच्या कमी होत चाललेल्या सहनशीलतेवरही चिंता व्यक्त केली. आजच्या तरुण पिढीमध्ये तडजोड करण्याची वृत्ती नष्ट होत चालल्यामुळे कुटुंबव्यवस्थेवर परिणाम होत आहे असेही त्यांनी सांगितले. घरात सासू–सासरे नको, एकत्र कुटुंब नको म्हणणाऱ्या मुलींना भविष्यात पुढे काय परिणाम भोगावे लागतात यावर त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

त्यांनी स्त्रीभ्रूणहत्येवरील " वाचवा आपल्या लेकीला" ही कविता सादर करून समाजातील ज्वलंत प्रश्नांवर भाष्य केले. त्यानंतर "मेस" ही कविता सादर करत आपल्या कॉलेज जीवनातील मेसच्या आठवणींना उजाळा दिला, ज्याला विद्यार्थिनींनी टाळ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला..

या कार्यक्रमाला संस्थेचे प्रभारी प्राचार्य डॉ. आर. टी. पाचकोर, स्थापत्य विभागाच्या प्राध्यापिका डॉ. राधा बंग, विद्युत विभागाच्या विभागप्रमुख डॉ. स्वाती भस्मे, तसेच इतर महिला अधिकारी व विद्यार्थीनी उपस्थित होत्या. विविध विद्यार्थिनींनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे आयोजन प्राध्यापक डॉ. विनिता पालसिंगणकर यांनी केले, तर दीक्षा कुलकर्णी, सपना सांगळे, ऋतुजा सावंत, साहिल मगरे आणि विशाल पांडव यांनी यशस्वीतेसाठी मोलाची मदत केली.

महिला दिनाच्या निमित्ताने झालेल्या या कार्यक्रमाने विद्यार्थिनींना आत्मनिर्भरतेचा आणि सामाजिक जाणिवेचा महत्त्वपूर्ण संदेश दिला.

# श्रीयश प्रतिष्ठानच्या टेक्निकल कॅम्पसमध्ये तांत्रिक महोत्सव तक्ष्यंत्र: २०२५ उत्साहात संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – श्रीयश प्रतिष्ठानच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पॉलिटेक्निक आणि मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने " तक्ष्यंत्र: २०२५ " या भव्य तांत्रिक महोत्सवाचे आयोजन ११ आणि १२ मार्च २०२५ रोजी श्रीयश तांत्रिक कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले. या महोत्सवात संपूर्ण महाराष्ट्रभरातील एकूण ५५ महाविद्यालयांमधून १०९३ विद्यार्थ्यांनी नावनोंदणी केली. इंजिनिअरिंग, पॉलिटेक्निक, फार्मसी, मॅनेजमेंट, विज्ञान आणि वाणिज्य अशा विविध शाखांतील विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिभेचे दर्शन घडवले.

या तांत्रिक महोत्सवात एकूण ११ तांत्रिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ब्रिज मेकिंग, ब्लाइंड कोडिंग, सर्किट डीबगिंग, वेल्डिंग बॉटल, टेक क्विझ, रोबो रेस, बिझनेस ब्लिट्झ, वादविवाद स्पर्धा, जस्ट अ मिनिट, प्रोजेक्ट स्पर्धा आणि ई–स्पोर्ट्स यांचा समावेश होता.

या सर्व स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी आपले तांत्रिक कौशल्य सिद्ध केले. प्रत्येक स्पर्धेसाठी तीन पारितोषिके देण्यात आली, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह अधिकच वाढला.

महोत्सवाचे उद्घाटन ११ मार्च २०२५ रोजी एंड्युरन्स टेक्नॉलॉजीजचे उपमहाव्यवस्थापक, सूर्यनारायण मूर्ती कोंडुरी यांच्या हस्ते पार पडले. प्रमुख पाहुण्यांनी संशोधनाबाबत मार्गदर्शन केले. १२ मार्च २०२५ रोजी संध्याकाळी समारोप व बक्षीस वितरण समारंभ पार पडला. या समारंभाचे प्रमुख पाहुणे एस. व्ही. ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे संस्थापक मनोज कदम होते. त्यांनी विजेत्या विद्यार्थ्यांना गौरविण्यासोबतच तंत्रज्ञानाबद्दल मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी या तांत्रिक महोत्सवात आपले विविध प्रकल्प, प्रयोग आणि संशोधन कार्य सादर केले. यशस्वी आयोजनाबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरूळे यांनी सर्व प्राचार्य, डीन अकॅडेमिक्स, कार्यक्रम समन्वयक विद्यार्थी समन्वयक यांचे मनः पूर्वक अभिनंदन केले. या कार्यक्रमाच्या जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांनी शहराच्या विविध ठिकाणी "फ्लॅश मॉब" सादर केला. या अभिनव उपक्रमाने नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आणि "तक्ष्यंत्र: २०२५" विषयी व्यापक जनजागृती झाली.




## लक्षवेधी छायाचित्र....



फूटपाथ वर लोकरी वूलच्या माध्यमातून अशी सुंदर सजावट शहराच्या सौंदर्यात भर टाकत आहे....

(छाया सौजन्य : फेसबुक )





– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com




## आनंदी पहाट...

# संवादाचे प्रभावी माध्यम सकारात्मकतेसाठी वापरावे

ज्योतिर्मय साहित्य

काहीवेळा आपल्या आपापसातील संवादाची सुरुवातच विसंवादानं होत असल्याचं दिसून येतं. विचारांचा अभाव हे खरं तर त्यामागचं मूळ कारण असतं. संवादाचा अभाव हे माणसांमाणसांत दुरावा निर्माण होण्याचं एक महत्वाचं कारण असतं. ह्यामध्ये अनेकदा आचारांपेक्षा विचारांना महत्व आणि प्राधान्य कमी दिलं जात असतं. विवेकी विचार न करताच आचरण केलं जातं, कृती केली जाते; काहीवेळा ती तापदायक, घातक ठरू शकते. अलीकडच्या काळांत विभक्त कुटुंब, कौटुंबिक कलह आणि निर्माण झालेले क्लेश, द्वेष ह्यामुळे बहिण-भाऊ, भाऊ-भाऊ, पती-पत्नी, पिता-पुत्र, सासू-सून यांच्यात विचारांचं आदान प्रदान होतंच असं नाही. रक्ताच्या नात्यांत देखील अविचार आणि संवादाआभावी अनेक गैरसमज, समस्या निर्माण झाल्याचं दिसून येतं. आपली सुख-दुःख, भाव-भावना, विचार-आचार, ह्या बाबींची देवाणघेवाण करायला वावच नसतो, असं नाही. परंतू विचारांच्या माध्यमातून सुखाच्या यशोशिखरांवर पोहोचण्यासाठी आपापसातील संवादालाच बगल दिली जाते. परस्परांमधील नातेसंबंध, आपलेपणाची भावना, जिव्हाळा, प्रेमाचा ओलावा कोण टिकवणार? प्रगल्भ विचार आणि दिलदार मन लाभलेली कोणतीही व्यक्ती आकृती उरत नसते, तर ती स्वतःच एक कलाकृती बनून राहते. अशी व्यक्ती आपल्या संस्कृतीचं स्मरण ठेवून, स्वतःच्या प्रकृतीला अनुसरून, समाजातील विकृतीकरण थांबवण्यात सक्रीय असते. यांतूनच कलाकृती साकारली जात असते, पाहायला मिळते. अशा व्यक्ती आपलं जगण्यापलीकडचं जीवन सामाजिक बांधिलकीचं भान राखून नवनवीन कलाकृती साकारत असतात. स्वतःच भावनिक, मानसिक, आंतरिक आणि शारीरिक पातळीवर प्रत्येक संवाद घडवून आणायचा असतो. ह्या सर्वच बाबींचं समीकरण कसं मांडायचं हे ज्याला माहिती होतं, त्याला संवादात पूर्णपणे सहभागी होऊन त्या संवादाचं सुख प्राप्त करून घेता येतं. स्वतःचे विचार व्यक्त करण्यासाठी संवादासारखं प्रभावी माध्यम दुसरं कोणतंही नसतं.

# जे तुझ्याचसाठी होते...




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या भावना व्यक्त करताना ती म्हणते
त्या फुलासारखीच अबोल माझी प्रीत
ती अबोल पूजा माझ्या या ह्रदयात
नच ओठांवरती नाव तुझे कधी आले

फुल काही बोलते का ? त्याला तर फक्त समर्पण माहिती असते. आपल्या पूर्ण शक्तीनिशी, सौंदर्य लेवून ते उमलते, ते अर्पण होण्यासाठीच. तशीच प्रीतीची अबोल पूजा या विरहिणीच्या मनात सुरु आहे. ज्याच्यावर ती प्रेम करते, ती एवढी प्रसिद्ध, मोठी व्यक्ती आहे की आपल्या ओठांवर त्याचे नावही ती कधी घेऊ शकत नाही.


या कवितेच्या शेवटच्या कडव्यात ती म्हणते

तुज कसे कळावे ?
देवा नाही कळले !
मी दूर अलक्षित
तुजसाठी तळमळले
त्या फुलात माझे
ह्रदय ठेवुनी गेले.



माझी अबोल प्रीत तुला कशी समजावी ? माझ्या अंतरीच्या या भावना तुझ्यापर्यंत कशा पोहोचाव्या हे मलाच समजले नाही. मी मात्र दूरच, एकाकी. मी कशी आहे ? त्यासाठी कवीने फार सुंदर शब्द योजला आहे. अलक्षित हा शब्द खूप काही सांगून जातो. अबोल प्रीत, अबोल पूजा, अबोल समर्पण आहे. आपल्या प्रीतीचं उघड, बोलकं प्रदर्शन तिला करता येत नाही. कदाचित म्हणूनच ती अलक्षित आहे. पण तिचा समर्पण भाव ? तो अनमोल आहे. त्याची किंमत करता येणार नाही. म्हणून ती फक्त आपल्या प्रीतीचं फुल त्याच्या वाटेवर ठेवून त्यात धन्यता मानणारी आहे.

या गीतात दुसराही एक अर्थ आहे. या गीतात जशी अबोल प्रीत दडलेली आहे, तशीच परमेश्वरावरील अबोल भक्ती सुद्धा. त्याची अबोल पूजा तिच्या ह्रदयात आहे. तिच्या ह्रदयाचं फुल तिनं त्याला अर्पण केलं आहे. ते केवळ त्याच्यासाठीच फुललं आहे. समर्पणभाव असाच असतो. त्याला फक्त देणं माहिती असतं. परतीची अपेक्षा नसते. अशा या सुंदर, तरल भावना मंगेश पाडगावकरांनी आपल्या शब्दातून मांडल्या आहेत. उषा मंगेशकरांनी त्या शब्दातील आर्तता, भावना जणू जिवंत केल्या आहेत. एक अजरामर असं भावगीत रसिकांना त्यांनी जणू अर्पण केलंय.






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६


# सद् विद्या निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

राजपदावर असला तरी धार्मिक असतो. सर्व नियम बंध यांच्या बंधनात राहून तो आपले श्रेष्ठत्व सिध्द करतो. वाडवडिलांनी घालून दिलेल्या मार्गावर चालतो. कुलातील आचार विचार पाळून आचरणात आणतो. तचरणींण अगदी सहज आनंदाने, नियमितपणे व्यायाम, आहार विहार करतो. त्यामुळे कुठल्याही विकाराला बळी पडत नाही. असे म्हणतात की सद्गुणी माणसाच्या हातावर कमळाचे चिन्ह पहायला मिळते. आयुष्यात तो काही दैदीप्यमान कार्य करतो. तो सतत परोपकार करत असतो. आणि भगवत् भक्तित लीन असतो. सतत हातुन सतकर्मच होत असल्याने त्याचा स्वभाव निरामय व निराभिमानी असतो. मोठा ज्ञानवंत,भक्त म्हणून सर्वांना परिचित असतो. अनासक्त तत्वज्ञानी असतो. विद्वान गायक पण असतो.

आदर्श पुरूष जेवढा सदाचारी असतो तेवढाच तो प्रसंग ओळखुन वागणारा असतो. ज्ञानाच्या सर्व शाखात निश्चित मत देण्याईतपत तो मोठा असतो. तेवढी त्याची अध्यात्मिक पातळी वाढलेली असते. मनाला स्थिर ठेवतो, दयाळू व कर्मनिष्ठ असल्याने तो आत बाहेर अगदी स्वच्छ असतो. त्याच्या अंगी लोभ नसतो. हातून थोडी जरी चुक झाली तरी त्याला पश्चाताप होतो. त्याल श्रुती व स्मृती चे ज्ञान असते. भगवंताची स्तुती कशी करावी याचेही त्याला ज्ञान असते.माणसाची लबाडी कशी आहे हे तो ओळखुन असतो. प्रसंगाला किंवा माणसाला तो आरपार पाहू शकतो. मोठ्या कौशल्याने वागणारा फार वायुवेगाने कामे करून, विहितकर्म करून तो परतभगवत् भक्तितलीन झालेला दिसतो.अनेक सात्विक गुण त्याच्या अंगी भरलेले असतात. कोणाला किती महत्व द्यायचे, कोणाचा आदर सन्मान करावा.याचे तारतम्य त्याला असते. त्याचे ज्ञान अचुक असते. कार्याची व कारणांची लक्षणे त्याला माहिती असतात.तो नेहमीच सावध रितीने वागतो चालतो बोलतो, त्याला वेद, ऊपनिशदे, साहित्यातील सर्व प्रकार त्याला महित असतात. ज्ञान व विज्ञान या दोन्ही शाखांची त्याला विषेश आवड असल्याने तो नवनवीन शोध लावतो. **(क्रमश:)**

# साधक व नाम



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

प्रत्येक शब्दात रामच आहे असे ज्यांना वाटते त्यांची तयारी काही निराळीच असते. आपल्याला अमुक एका नावातच प्रेम येते; परंतु सिद्धांना मात्र कोणी कशाचाही उच्चार केला तरी नामाचाच केला असे वाटते. कोणत्या वाचेने नाम घ्यावे याचा नाही विचार करू. जसे होईल तसे नामस्मरण करा, पण नामाची कास सोडू नका. नाम घेऊन नामाचा अनुभव घ्या. विषयाचा घाला जेव्हा पडतो तेव्हा नामाची आठवण ठेवा. प्रल्हादाने नामाशिवाय दुसरे काय केले ? प्रल्हादाने नामावर जसे प्रेम ठेवले तसे आपण ठेवावे. आजवरच्या सर्व भक्तांनी हेच केले. एक नामस्मरण करा, हाच खरा मार्ग. स्मरणात रहा म्हणजे विषय आपोआप मरतील.

साधकाने लोण्यासारखे मऊ असावे. कोणाला कुठेही खुपू नये, आपण हवेसे वाटावे. आपण नि:स्वार्थी झालो तरच हे साधेल. कोणी आपल्या पाया पडताना, ‘मी या नमस्काराला योग्य नाही’ असे साधकाने मनामध्ये समजावे, म्हणजे कुणी नमस्कार केल्याचा अभिमान वाटणार नाही, आणि न करणाऱ्याचा राग येणार नाही. सत्कर्मानंतर आपली स्तुती ऐकायला साधकाने तिथे उभेसुद्धा राहू नये. भगवंत ज्याला हवा आहे, त्याने असे समजावे की, आपण आता कुस्तीच्या हौद्यांत उतरलो आहोत, अंगाला माती लागेल म्हणून आता घाबरून चालायचे नाही. यासाठी चांगली माणसे पहिल्यानेच मातीत लोळतात, म्हणजे ती लाज जाते.

भगवंताच्या प्राप्तीचे दोन मार्ग आहेत : एक मार्ग म्हणजे, आजपर्यंत सर्व त्याच्या इच्छेने घडून आले, माझे जे सर्व आहे ते त्याचेच आहे, त्याचे तो पाहून घेईल, तो जे करील ते सर्वांच्या हिताचेच करील, उद्याचा दिवस त्याच्या इच्छेनेच यायचा आहे, असे मनाशी ठरवून आपण त्याच्या स्मरणात निश्चिंत राहणे हा होय. दुसरा मार्ग म्हणजे, ‘मी जगात कुणाचाच नाही, मी रामाचा आहे’ असे म्हणून कुठेही प्रेम न ठेवता त्याच्या स्मरणात राहणे हा होय. हा मार्ग जरा कठीण आहे. यामध्ये मनाने इतर ठिकाणचे प्रेम तोडून टाकायचे असते, कारण प्रेम एकाच वस्तूवर राहू शकते. मन जर आपले ऐकत नसेल तर न ऐकू द्या. आपण चांगले-वाईट शोधावे, आणि त्याप्रमाणे करू लागावे; मन आपोआप तिथे येईल. म्हणूनच, ‘आपले मन मारा’ असे न सांगता ‘आपले मन भगवंताकडे लावा’ असेच संत आपल्याला सांगतात.

“ हेच माझे सर्वस्व आहे, ” असे नामात प्रेम असावे.

****

## संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

# आयुष्याचा उद्देश – सिद्धांत

ज्योतिर्मय साहित्य

प्रत्येक व्यक्तीच्या इच्छा असतात. त्या गोष्टी मिळाव्यात अशी गरजही असते. त्याचा क्रम साधारण पुढील प्रमाणे असतो.

अन्न, वस्त्र, निवारा, पैसा, प्रतिष्ठा व मी कोण? याचा शोध.

त्यातील अन्न,वस्त्र,निवारा,पैसा व भौतिक सुख सुविधा याच्या मागे माणूस लागतो. आणि आपण जेवढे त्याच्या मागे लागतो तितकेच ते पुढे पळते.जशी सावली धरता येत नाही तसेच काहीसे होते. मग ही सावली आपल्या मागे कशी येईल याचा विचार केला पाहिजे. आपण सूर्याकडे पाठ करुन चाललो तर सावली आपल्या पुढे असते.पण सूर्याकडे तोंड करुन चाललो म्हणजे सूर्याला सामोरे गेलो तर सावली मागे येईल. मग हा सूर्य कोण? तर आपण स्वतः .....

स्वतः कोण आहोत? स्वतः मधील क्षमता ओळखल्या तर या सगळ्या सावल्या, भौतिक सुखे, लोकप्रियता आपल्या मागे येते. म्हणजेच आपल्या आयुष्याचा उद्देश आपल्याला माहिती असणे महत्वाचे असते. जगात इतकी माणसे असताना माझा जन्म झाला आहे म्हणजे निसर्गाला माझ्या कडून काही काम करुन घ्यायचे आहे.हे लक्षात घ्यावे.

आपल्या सभोवती जी वैश्विक शक्ती आहे त्याचे आपण शक्तिशाली मानवी रूप आहोत. आणि या वैश्विक शक्तीला आपल्या कडून काही करून घ्यायचे आहे हे कायम लक्षात ठेवावे.

स्वतः मध्ये कोणते टॅलेंट म्हणजे दैवी शक्ती आहे याचा शोध घ्यायचा आहे. प्रत्येक व्यक्ती युनिक असते. प्रत्येकाची हुशारी, कौशल्ये वेगळी असतात.

या वेगळे पणाचा व आपल्यात असलेल्या वैश्विक शक्तीचा उपयोग करुन आपल्या संपर्कात येणाऱ्यांना आपण कशी मदत करु शकतो याचा विचार करायचा आहे.

? हा विचार प्राधान्याने करायचा आहे.

आपण जे लोकांना देतो ते आपल्याकडे कित्येक पटीने परत येते. म्हणून मला काय मिळणार या पेक्षा माझ्या कडून कोणाला काय मिळणार? माझ्यामुळे किती जण आनंदी होणार? याचा विचार करुन त्या प्रमाणे आचरण केले तर तोच आनंद कित्येक पटीने आपल्या कडे येणार आहे.

या साठी पुढील गोष्टी आचरणात आणाव्यात.

माझ्यात वैश्विक दैवी शक्ती आहे.माझा जन्म काही कारणा साठी झाला आहे. हे मान्य करावे.

स्वतः मधील युनिक टॅलेंट म्हणजे वेगळ्या दैवी शक्तीची यादी करावी.

ही यादी करताना काही गोष्टींचे स्मरण केले तर यादी करणे सोपे होईल.

उदा. आई वडील काय केल्यावर शाबासकी देत होते?
माझ्याकडे माणसे कोणत्या गोष्टी मुळे येतात?
माझ्या कोणत्या कृतीने माणसे आनंदी होतात?
माझ्या मधील कोणत्या गोष्टी मुळे मी लोकांना प्रिय आहे?

याचा विचार केला तर आपल्यात कोणते विशेष व इतरांच्या पेक्षा वेगळे गुण म्हणजेच वेगळी दैवी शक्ती आहे ते लक्षात येईल.

माझ्याकडे अमर्याद पैसा व वेळ असेल तर मी इतरांच्या साठी काय काय करु शकेन याची यादी करणे. जे करावेसे वाटेल ते म्हणजे विशेष गुण आहेत. ज्या गोष्टी करायला आवडतात त्यांची एक यादी करणे.

माझ्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मी कशी व कोणती मदत करु शकेन? ज्या मुळे त्यांच्या आयुष्यात आनंद निर्माण होईल.

हे जर आपण अंमलात आणले तर नक्कीच आपल्या आयुष्यात एक वेगळा आनंद निर्माण होणार आहे.

हे सगळे करण्याचा उद्देश एकच आहे. तो उद्देश म्हणजे स्वतः ला ओळखणे. स्वतः मधील क्षमता,सकारात्मकता व स्वतः मधील वेगळे पण ओळखणे. एकदा आपण स्वतःला ओळखले की बाकीच्या गोष्टी आपोआप मागे येणार आहेत.



# नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**तानीन्द्रियाण्यविकलानि तदेव नाम**
**सा बुद्धिरप्रतिहता वचनं तदेव।**
**अर्थोष्मणा विरहितः पुरुषः क्षणेन**
**सोऽप्यन्य एव भवतीति विचित्रमेतत् ।।**

अर्थ – मनुष्याची निरोगी इन्द्रिये तीच आहेत, नाव ही तेच आहे, अप्रतिहत म्हणजे अखंडित अशी बुद्धीही तीच आहे, वाणी देखील तीच आहे. पण धनाची उर्जा नसेल, तर माणूस क्षणात कोणी तरी वेगळाच होऊन जातो, ही फारच विचित्र गोष्ट आहे.

या श्लोकात कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी माणसाची निरोगी इन्द्रिये, बुद्धी, वाणी यांना धन असेल, तरच अर्थ प्राप्त असतो. धनाच्या अभावात इन्द्रियादि सर्व काही निष्फळ ठरते; असे प्रतिपादन केले आहे.

# आचरणात आणावे असे



ज्योतिर्मय साहित्य

आपण आपल्या आसपासच्या वृद्ध गृहस्थांना व्हाट्सअॅप वापरायला शिकवा, म्हणजे एखाद्या दिवशी संदेश आला नाही तर ती व्यक्ती आजारी असू शकेल किंवा त्या व्यक्तीच काही बरवाईट झाल असेल अस वाटून तुम्ही चौकशी तरी करू शकाल. आता तुम्हाला रोज संदेश पाठवण्यामागच कारण लक्षांत आल असेलच.

“वेदांचा” अभ्यास करणं खुप सोपं आहे परंतु ज्यादिवशी आपण दुस-याच्या “वेदनांचा” अभ्यास करू त्यादिवशी “ईश्वर” भेटला असे समजा. एकटेपणा हा माणसाच्या जीवनात नेहमी चांगल्यासाठीच येत असतो कारण हरवलेल्या प्रश्नांची उत्तरे त्या एकटेपणातच सापडतात. परिस्थिती माणसाला मजबुर करते पण परिस्थितीवर मात करण्याची जिद्द माणसाला मजबुत करते. म्हणून प्रत्येक गोष्टीत चांगले पाहण्यासाठी आपल्या मनाला प्रशिक्षित करा , सकारात्मकता ही एक निवड आहे , आपल्या जीवनाचा आनंद हा आपल्या विचारांच्या गुणवत्तेवर अवलंबुन असतो. जसे लाखाची गाडी एका चावी आणि ब्रेकवर अवलंबुन असते तसेच कोटीचे घर एका कुलुप आणि किल्लीवर अवलंबुन असते तसेच आपले व्यक्तीमत्व सुद्धा आपल्या विचारावर व स्वभावावर अवलंबुन असते.




# एकदा पदार्थ तळलेले तेल पुन्हा वापरावे का?

ज्योतिर्मय साहित्य

पदार्थ तळून झाले की एक प्रश्न कायमच असतो की उरलेल्या तेलाचं काय करायचं? कुणी म्हणतं ते तेल भाजीआमटीला वापरुन टाकावे.


कुणी त्यातच पुन्हा पुन्हा पदार्थ तळते. कुणी ते तेल न खाता सरळ फेकून देते. यातलं खरंखोटं काय? तळलेल्या तेलाचं नेमकं करायचं काय?

आणि मुळात म्हणजे एकदा पदार्थ तळलेले तेल पुन्हा पुन्हा वापरावे का?

तर त्या प्रश्नाचं एकच उत्तर की एकदा आपण ज्यात पदार्थ तळला, ते तेल उरलं तर ते तेल अजिबात वापरू नये. असे पुन्हा पुन्हा गरम केलेले तेल आरोग्यासाठी अतिशय घातक असू शकते.

तळलेले तेल पुन्हा पुन्हा का वापरू नये?

१. तळलेले तेल पुन्हा पुन्हा वापरणे आरोग्यासाठी अतिशय हानीकारक असू शकते. त्या तेलाच्या पुर्नवापराने कॅन्सरसह अनेक घातक आजार होण्याची शक्यता असते.



२. पुन्हा पुन्हा तळलेले तेल वापरल्याने खराब कॉलेस्टेरॉल वाढते.

३. पुन्हा पुन्हा गरम केलेल्या तेलाच कॅन्सर कॉजिंग एजंट, पॉलिसायकलिक ॲरोमॅटिक हायड्रोकार्बन म्हणतात ते हानीकारक घटक असतात. त्यानं कर्करोग होण्याचा धोका बळावतो.


४. अनेकदा गरम केल्यानं तेलात विषारी प्रक्रिया सुरु होते.


५. त्यातले चांगले घटक कमी होतात.

६. म्हणून पुन्हा पुन्हा तळलेले तेल आरोग्याला अतिशय हानीकारक असते ते वापरू नये.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

इथे गोष्ट ( कविता ) संपते. पण आपले विचारचक्र सुरु करते. मनात काहीतरी पेरून जाते. प्रत्येकाकडे देण्यासारखे काहीतरी असतेच. तो विश्वाचा निर्माता रिकाम्या हाताने कोणालाच या धरेवर पाठवत नाही. ज्याने जीवनाचा हा उत्सव मांडला आहे आणि तुम्हाला त्यात सामील होण्याचे आमंत्रण दिले आहे, तो तुम्हाला या जगात भिकारी म्हणून कसे पाठवेल ? भिकारी म्हणून तुम्ही या उत्सवात सामील व्हावे अशी त्याची इच्छा असेल का ? त्यामुळे परमेश्वराने जर तुमच्याकडे काही मागितले तर माझ्याकडे काहीच नाही असे न म्हणता तुमच्याकडचे जे सर्वोत्तम आहे, ते त्याला देऊन टाका. तुम्ही जे द्याल, त्याचे सोने होईल, ते शतपटीने परत मिळेल. जीवनाचा अमूल्य संदेश देणारी ही झोळीची गोष्ट !

कवी मंगेश पाडगावकर म्हणतात तसे या जन्मावर या जगण्यावर अपार प्रेम करणारा हा कवी होता. त्यांची एक छोटीशी कविता आपल्याला सांगते

फुल फुलले हीच फुलाची अंतिम कथा
फुलाचे साफल्य त्याच्या बहरण्यात आहे.
फुल विचारते, फळा, तू कुठे आहेस ?
फळ उत्तरते, मी तुझ्या हृदयात आहे.

या कवितेतून ते आपल्याला सांगतात की प्रत्येक फुलाला उमलण्याच्या पूर्ण अधिकार आहे. त्याला कुणी अडवता कामा नये. आजही आपल्या अवतीभवती पाहिलं तर आपण किती फुलांना पूर्णपणे फुलू देतो ? किती कळ्या अकाली तोडतो ? किती कळ्यांचे निर्माल्य होते, किती फुले अकाली कुस्करली जातात ? यासाठीच तर तसे संस्कार करणारी शिक्षणपद्धती हवी होती. जी मनुष्यधर्म शिकविते. त्यातूनच शांतिनिकेतनची निर्मिती झाली.

रवींद्रनाथांची भारताला दिलेली सर्वात मोठी देणगी कोणती असा प्रश्न जर कोणी विचारला तर माझ्या मते आपल्या भारताचं राष्ट्रगीत जन-गण -मन ही आहे. कारण रोज भारतातील लक्षावधी शाळांची सुरुवात या राष्ट्रगीताने होते. कोटी कोटी कंठातून हे राष्ट्रगीत निनादते. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी या दिवशी ध्वजाला प्रणाम करताना जेव्हा राष्ट्रगीताचे सूर कानी पडतात, तेव्हा छाती अभिमानाने फुलून येते. एखाद्या चित्रपटगृहात चित्रपट पाहायला जाताना जेव्हा पडद्यावर राष्ट्रगीत सुरु होते, तेव्हा चित्रपटगृहात उपस्थित असलेली सगळी माणसे आपली भाषा, जात, धर्म, पंथ विसरून उभे राहून मानवंदना देतात, तेव्हा अभिमानाने रोमरोम फुलून येतो. कधी कुठे जाताना राष्ट्रगीताचे सूर कानी पडले तर नकळत पावले थांबतात. उभे राहा असे कोणी सांगावे लागत नाही. केवळ ५२ सेकंदात गायिले जाणारे हे राष्ट्रगीत रोमरोम पुलकित करते. जोपर्यंत हे सूर्य चंद्र आहेत, जोपर्यंत ही सस्यश्यामल भारतभूमी अस्तित्वात आहे, तोपर्यंत जन-गण-मन आहे आणि जोपर्यंत जण-गण-मन आहे, तोपर्यंत गुरुदेव रवींद्रनाथ टागोरही अमर आहेत.

अशा या जन-गण-मन आणि रवींद्रनाथ टागोरांवर काही लोकांनी नको ते आरोप केले. ज्या रवींद्रनाथांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली, स्वदेशीच्या चळवळीत पुढाकार घेतला, वंगभंगाला विरोध केला अशा देशभक्त आणि राष्ट्रभक्त रवींद्रनाथांना इंग्रज धार्जिणे म्हणण्यापर्यंत काहींची मजल गेली. तर काहींनी याच्याही पुढे जाऊन त्यांनी लिहिलेले जन-गण-मन हे पंचम जॉर्जच्या स्वागतासाठी लिहिले असे म्हटले. या सगळ्या गोष्टींमुळे रवींद्रनाथांच्या संवेदनशील मनाला अपार वेदना झाल्या.

# परीक्षेच्या प्रशासकीय कामकाजासाठी ऑनलाईन प्रणाली विकसित-प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर

## अण्णासाहेब मगर महाविद्यालयात परीक्षा विषयक कामांची देयके ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठीची प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**पुणे** – महाविद्यालय स्थरावरील परीक्षेसंबंधी देयके सादर करत असताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या संदर्भात महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांची मते विचारात घेऊन ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे. प्रशासकीय कामात वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी तसेच अचूकता व पारदर्शकता आणण्यासाठी पेपरलेस प्रशासकीय कामकाज करण्यावर विद्यापीठाचा भर असणार आहे. असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वित्त व लेखा विभाग आणि पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर यांच्या संयुक्त विद्यमाने परीक्षा विषयक कामांची देयके ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठीची प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उदघाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सहसचिव प्रशासन ए. एम. जाधव,




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. धोंडीराम पवार, परीक्षा संचालक डॉ. प्रभाकर देसाई, वित्त व लेखा अधिकारी वित्त व लेखा अधिकारी चारुशीला गायके, प्राचार्य रितेश पाटील उपस्थीत होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सहसचिव प्रशासन ए. एम. जाधव यांनी परीक्षा विषयक कामांच्या देयकांसाठी ऑनलाईन प्रणाली ही महाविद्यालयांसाठी उपयुक्त असून त्यामुळे यामुळे प्रशासकीय दिरंगाई होणार नाही. परीक्षा संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी परीक्षा सुरळीतपणे व्हाव्यात, मुल्यमापनाचे कामकाज वेळेत व्हावे यासाठी लवकरच प्राचार्य आणि महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांची विद्यापीठ कार्यशाळा आयोजित करणार असल्याचे सांगितले. या कार्यशाळेत पुणे शहर व जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील ५५० कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रशांत मुळे, डॉ. शुभांगी औटी, डॉ. अण्णासाहेब निंबाळकर, डॉ. अजय कवाडे, गणेश साबळे यांनी या कार्यशाळेचे संयोजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अजय कवाडे यांनी केले तर आभार डॉ. प्रशांत मुळे यांनी मानले.

# होळी व रंगपंचमी

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

माणसाच्या जीवनात विविध रंग भरलेले आहेत, म्हणूनच, आपले जीवन सुखकर होते. विधात्याने अत्यंत तन्मयतेने विचार करुनच या जगातील माणसाच्या जीवनात अनेकविध नवरंग भरलेले आहेत. त्या रंगांच्या आधारेच तर माणूस आपले जीवन जगत असतो. सुखदुःखांच्या रंगानेच तर माणसाला जीवनाचा अर्थ कळत असतो.त्यामुळेच तर,जीवनाची चव घेत, आनंद घेत तो जगत असतो. पण, या एकविसाव्या शतकातील माणसे मात्र, ते पुर्णतः विसरलेली आहेत.



मधुकर निलेगावकर,
पुणे

निसर्गनियमांचे पालन न करता तसेच, मनमानेल तसे, बेभानपणे, अवैधपणे जगी वागत आहेत. वाटेल तसे रस्त्यावरुन बेभानपणे कार, ट्रक चालवत वाटेल तसे वर्तन करीत आहेत. तसेच, मोठ्या प्रमाणात जंगलकटाईही करीत आहेत. याचा परिणाम निसर्गचक्रावरही झाला आहे. त्यामुळे,

निसर्गाचे रंगही माणसाने बदलायला सुरुवात केली आहे. त्यामुळे, कधीही अवकाळी जोराचा



पाऊस पडत आहे . गारपीट होते आहे. मध्येच उष्णता मध्येच थंडी पडत आहे. हा माणसांच्या वर्तनात आणि स्वभावात झालेल्या बदलत्या रंगांचा परिणाम आहे. म्हणूनच,तर जगात काही माणसांमुळे ही सध्याची परिस्थिती सर्वत्र ओढवलेली आहे. तसेच, अशा माणसांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. अशा माणसांच्या अशा वृत्तीला पुर्णत: आळा हा बसलाच पाहिजे. आजची बेताल वागणा-या आणि बेभान बोलणा-या आणि तसंच चालणा-या माणसांमुळे या विविध रंगांच्या सणाच्या आनंदाचे रंग बदलू लागले आहेत. याचा थोडा देखील विचार आणि विवेक या माणसांजवळ आज राहिलेला नाही. बहुरंगी जीवन छानपणे आनंदाने जगण्यासाठी आणि त्याचा उत्तम आस्वाद घेता येण्यासाठी सृष्टीच्या निसर्ग नियमानुसार आणि आपल्या पूर्वापार चालत आलेल्या हजारो वर्षांच्या संस्कृतीनुसार आपण सर्वजण चांगले वागू या ! आणि आपल्या सणांचा व या छान जीवनाचा आनंद सदैव लुटू या. आपली भारतीय संस्कृती म्हणजेच हिंदूसंस्कृती जगात महान आहे. आपल्या देशातील प्रत्येक सणाला विशिष्ट महत्व व विशिष्ट अर्थ आहे. त्यामुळेच, सर्वांचे जीवन सदाबहार रंगीन होते. म्हणूनच, परदेशातील शेकडो पर्यटक अशा सर्व सर्व सणांचा आनंद लुटण्यासाठी, आनंद घेण्यासाठी भारतात येतात. याबाबतीत आपला भारतदेश जगात सर्वश्रेष्ठ आहे. याचा आपल्याला अभिमान हवा. याचा गर्व असलाच पाहिजे. गर्वसे कहो! हम हिंदू है!जय हिंद! जय महाराष्ट्र! रंगपंचमी बाबतची एक स्वरचित कविता यासोबत सादर केली आहे.

''रंग रंगपंचमीचे, रंग माणसांचे''
होळीच्या रंगपंचमीचे असतात बहू रंग
निसर्गनिर्मित विविध बारा मनमोही रंग

जे रंग भूषवितात माणसाचे सकल अंग
परि,माणूस दाखवितो निज वेगळेच रंग

दाखवी स्वभावाचे वेगळेच रंग अन् ढंग
सोडून दे माणसा, तव दूष्कर्मांचे रे रंग!

राग,लोभ,मोह,मद,मत्सर, दूर कर या रंगांना
जवळ कर तू प्रेम,ममता,जिव्हाळा या रंगांना

जाण!तू हा होळीपौर्णिमा व रंगपंचमीचा अर्थ
तरच,येईल माणसा!जीवनासी अर्थपुर्ण अर्थ

# शाळा ही धर्म निरपेक्ष असावी - तारका वानखेडे

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

बहुआयामी व्यक्तिमत्वाची ओळख झाली.अनेक नवीन गोष्टी शिकायला आणि ऐकायला मिळाल्या. नास्तिक कुटुंबात जन्माला आलेल्या तारकाताई यांनी बालपणीच्या अनेक हृदयस्पर्शी आठवणी आवर्जून सांगितल्या. बालपणीच्या अंगणवाडीतला पहिला दिवस जेव्हा त्यांना त्याचे बाबा घ्यायला आले तेव्हा त्यांच्या मॅडम यांनी त्यांच्या बाबांना प्रश्न विचारला. का हो सर तारकाला आई नाही आहे का? त्यावर त्यांचे बाबा म्हणाले की, मॅडम काय झालं? अहो सर पहिल्या दिवशी सर्व मूल आई आई म्हणून रडत होते. पण तारका दीदी मात्र बाबा बाबा म्हणून रडत होत्या .

तारका हे नाव त्यांच्या वडीलांना खगोलशास्त्राच्या अभ्यासाची आवड असल्यामुळे ठेवण्यात आले. त्यांच्या गोड आवाजाचे रहस्य देखील त्यांनी सांगितले. संगीतातील पाच परीक्षा त्या उत्तीर्ण आहेत.

बुद्धिबळ कौशल्य, पक्षी निरीक्षण कौशल्य, हस्तकला कौशल्य, पपेट शो, आदर्श शिक्षिका, आदर्श माता, आदर्श मुलगी, आदर्श पत्नी, समाजातील आदर्श प्रेरणादायी महिला अशा सर्व भूमिका त्या अतिशय योग्य न्याय देऊन बजावतात. ही बाब कौतुकास्पद आहे. मला त्यांची आवडलेली सर्वात महत्त्वपूर्ण बाब ही की त्या इतक्या कला गुणांनी युक्त अष्ट पैलू व्यक्तिमत्व असूनही किंचितही गर्वाच यत्किंचितही लवलेश नव्हता. त्यांनी त्यांच्या आणि माझ्या पहिल्या भेटीतच अतिशय मनमोहक हास्य देऊन हृदय जिंकण्याची कला त्यांच्या ठायी आहे .

मी आतापर्यंत आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह




पाहिला आहे. पण यांचा विवाह हा अनिसनीय होता ही बाब त्यांनी विशेष उल्लेख करून सांगितली. समविचारी व्यक्तीशी केलेला विवाह आयुष्य आनंदाने समृद्ध करतो. त्यांच्या विवाहाचे मध्यस्थी हे अमीर हबीब काका होते हे देखील त्यांनी सांगितले. तारका जी यांनी त्यांच्या व्यक्तिमत्वाचा खरा विकास हा नई तालीम या शाळेत झाला. असे त्यांनी सांगितलेच. आपण जिथे घडतो त्या मातीची नाळ आपल्या रक्तात भिनतेच त्या मातीबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे विशाल हृदयाचे लक्षण आहे. जोडीदाराबद्दल बोलताना त्या म्हणाल्या की स्त्री पुरुष समानता ही मूल्य त्यांच्या परिवारात रुजलेले आहे. त्यांना टिकली लावण्यास बंधन नाही. इतकी समाजसुधारक विचार सरणी आणि त्यानुसार कृती ही बाब अतिशय अनुकरणीय आहे. एखादा प्रश्न पडला, अडचण आली तर ते दोघे अगोदर चर्चा करतात. तारका दीदी ची ही गोष्ट मला फार फार आवडली. त्यांनी न्यू व्हिजन मध्ये जॉब केला. नंतर मुलगा लहान असल्यामुळे वेळेचे नियोजन व्यवस्थित होत नसल्यामुळे त्यांनी तो जॉब सोडला. आणि शिकवण्या घेण्यास सुरुवात केली.त्यांनी त्यांच्या आर्थिक संघर्षाचे देखील वर्णन केले. शिकवण्यात आलेली रक्कम पूर्ण पने घरभाडे देण्यापूर्तीच यायची. नंतर त्यांनी एमआयटित नौकरी सुरू केली. तिथे एक मनुष्य मंदिर बांधणीसाठी वर्गणी मागण्यासाठी आला होता. प्रत्येक शिक्षकाला तीन हजार रुपये भरायचे होते. ही गोष्ट तारका दिदीला मान्य नव्हती. त्यांनी घरी यावर चर्चा केली. तेव्हा त्यांचे मिस्टर त्यांना म्हणाले, की तुला जर गोष्ट पटत नसेल तर तू त्या गोष्टीविरुद्ध स्टँड घे . ठामपणे उभी रहा. त्या म्हणाल्या , अश्याने माझा जॉब जाईल. मग नौकरी सोड. तत्वावर ठाम रहा. त्यांना मार्ग सापडला. त्यांनी दुसऱ्या दिवशी शाळेत चर्चा केली. त्या म्हणाल्या, शाळा धर्मनिरपेक्ष असायला हवी. मुख्याध्यापकाला म्हणाल्या की सर मला मंदिर बांधण्यासाठी शाळेसारख्या ठिकाणी पैसे देण्याची गरज वाटत नाही. उद्या तुम्ही मशीद बांधण्यासाठी कोणी आले तर त्याला पैसे द्याल का? कोणी चर्च बांधण्यासाठी पैसे मागायला आले तर ते तुम्ही त्यांना द्याल का? ते सर त्यांना म्हणाले, मॅडम मला तुमचे म्हणणे मान्य आहे . पण मी काहीही करू शकत नाही. तारका दीदी यांच्या निर्भीड आणि सडेतोड वृत्तीला मानाचा मुजरा. त्यांना त्या शाळेवर त्यांच्या कार्यामुळे आदर्श शिक्षिका हा पुरस्कार मिळाला.



सौ. जयश्री अर्जुन मुंडे
अंबाजोगाई

अयोग्य गोष्टी विरुद्ध उभे राहणे, त्या गोष्टीवर ठामपणे तटस्थ होऊन निर्णय घेतला तर होणाऱ्या दुष्परिणाम तोंड द्यायला देखील व्यक्ती जर सक्षम असेल तरच आपल्याला न पटणाऱ्या गोष्टी पुढे हिमतीने स्टँड घ्यावा.

पपेट शो बद्दल बोलताना त्या म्हणाल्या , मूल ही पपेट शो मधून जास्त शिकतात. त्यांच्या शिकलेल्या गोष्टी चिरकाल स्मरणात राहतात. अशा विविध कलागुणांनी बहार आलेले सुगंधित व्यक्तिमत्व म्हणजे तारका दीदी आहेत. अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या.

त्यांच्या आयुष्यातील संघर्ष त्यांनी मांडला. त्यांनी मुलाच्या नावाला आडनाव लावले नाही आहे. मुलाचे नाव त्यानंतर आईचे नाव , आणि त्यानंतर वडिलांचे नाव असे '' जात रहित समाज '' या कृतीकडे वाटचाल आवडली. धर्मनिरपेक्ष हे तत्व अशा कृतीशिवाय अमलात येऊ शकत नाही.

समाजात परिवर्तन करणाऱ्या व्यक्ती आता मला मनापासून आवडायला लागल्या आहेत. कारण त्या व्यक्ती संविधानाला प्रत्यक्ष आयुष्यात उतरवतात. त्यातील विचारांप्रमाणे कृती करतात. त्यांच्या अशा धर्मनिरपेक्ष कार्याला कोटी कोटी सलाम

शाळा ही धर्मनिरपेक्ष असावी या विधानाप्रमाणे त्यांनी घेतलेलं ठाम निर्णय त्यांनी कृतीत उतरवला. जो बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत जोशी यांनी केले. तारका वानखेडे यांचा सत्कार आदरणीय ज्येष्ठ साहित्यिक अमर हबीब काका यांनी केले. शरद लेंगे यांनी पुस्तक सप्रेम भेट दिलं. असा जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. अशा कार्यक्रमातूनच व्यक्तिमत्व घडतात. विकासासाठी अनेक दिशा मिळतात. अनेक मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

स्त्री नि पुरुष समानता
आधुनिक विचारसरणी
धर्मनिरपेक्ष तत्वांची
करू या ती रुजवनी

# विनोद सम्राट दादा कोंडके


**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आज १४ मार्च, आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांचा स्मृतिदिन. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहानपणापासूनच सर्व जण त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले. लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली. दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँड वाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले. वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले. १९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा. शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहायला प्रेक्षकांच्या रांगा लागल्या. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला.



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली. तमाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले. दादांच्या विनोदाला मराठी रसिकांनी मनमुराद दाद दिली. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव. सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान वाढली होती. या लोकप्रियतेचा धसका हिंदी चित्रपट सृष्टीनेही घेतला होता. दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली. सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली. तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले. सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही उलट सेन्सॉर बोर्डशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली. १४ मार्च १९९८ रोजी



हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला. मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

***

# मनाचा निर्धार हवा

माणसाचं आयुष्य विसंगतीने भरलेले आहे. काही जणांचे सुसंगतीने भरलेले असतेही जर त्याला विचारांची साथ आणि साधू माणसांची संगत मिळाली तर. ग्रामीण भागात म्हणच आहे की, संगत गुण सोबत गुण. मातीसंगे फुलाला की फुलासंगे मातीला सुवास लागलेला असतो. फुलांच्या संगतीने मातीचेही आयुष्य सुगंधित होते. पण आपण कमळासारखे असावे. त्याला चिखलात राहूनही दुर्गुण लागत नाही. तसे मलाही आयुष्यात काही अखाद्य आणि अपेयपान करणारी माणसे भेटली होती. परंतु मी निर्लेप राहिलो. मी म्हणतो मी गवत खाणारा माणूस आहे म्हणजे शाकाहारी ज्वारी, तांदूळ, गहू आदी तृणधान्ये खाणारा माणूस आहे. माझ्या आयुष्यात काही मद्यपान करणारी माणसेही आली. परंतु त्यांच्या सहवासात राहूनही मी त्या वाटेला कधी गेलो नाही. एक सहकारी तर फुल्ल पिऊन तर्र व्हायचे मग त्यांना सांभाळून रूमवर आणण्याची जबाबदारी माझीच असे. त्यांना किती समजावून सांगत असे मी आणि इतरही अनेकजण पण त्यांच्या वृत्तीत काही फरक पडला नाही.

माणसाचं काय कधीही वाहवत जातात. नदीचा आणि समाजाचा प्रवाह सतत वाहत असतो. नदीत पोहणाऱ्याला ती नदी वाहून नेऊ शकते की पण मनाचा निर्धार असल्यावर पैलतीराला लागणे सोपे असते. पण प्रवाहात वळणे आणि मोहही खूप असतात. पट्टीच्या पोहणाऱ्याला ती आडवू शकत नाहीत. आकर्षणे जीवनात देखील खूप असतात. पण त्यापासून सावध राहावे लागते मन पक्क असेल तर काही अवघड नाही. जीवनाच्या वाटेवर जशी फुले असतात तसे काटेही असतात पण कुणालाही भीक घालायची नाही. आपण सतत पुढेच जायचे अगदी वसंत बापट यांच्या कवितेतील सदैव सैनिका पुढेच जायचे न मागुती तुवा कधी फिरायचे.

डॉ. प्रकाश रामचंद्र क्षीरसागर
९०११०८२२९९

मन काय वाईट गोष्टींकडे लगेच आकर्षित होते. म्हणून तर म्हटले आहेच की मना सज्जना ... मन हे खोलातच जाते. पाणी जसे उताराला जाते. तसे मनाचेही आहे. किती तरी धोके माहीत असूनही माणसे वाममार्गाला का जातात. तिन्हीसांजा झाल्या की घराकडे परत न येता पावले बारकडे का जातात. जुगारी अड्ड्याकडे का वळतात. याचे कारण माणसाला त्या गोष्टीची ओढ लागते. त्याला आवरणे आपल्याच हातात असते. पंडिताच्या सहवासात राहून पोपटाला श्लोक म्हणायची सवय लागते तर डाकूंच्या किवा वाईट प्रवृत्तीच्या माणसात राहून शिव्या देण्याची सवय लागते. आता काय शिकायचे हे पोपटाला कळत नाही परंतु माणसाला तर कळते त्याची सद्सद्विवेक बुध्दी त्याला पदोपदी अडवू पाहते. फक्त काय विवेक शाबूत असला पाहिजे. मी काय उपदेश करीत बसलो आता. लोक ऐकण्याच्या मनःस्थितीत नाहीत रे बाबा. बुडत्याचा पाय खोलातच असतो.

माणसाला चांगलं वागण्याची आवड पाहिजे. सुसंगती पाहिजे नाहीतर संतांच्या सहवासात देखील माणसे बिघडू शकतात. काय घ्यायचे हे ठरवले पाहिजे. नाहीतर मोह हे पदोपदी आहेतच. सैन्यातील माणसांना देखील पैशाचा मोह होतोच की. ते परदेशातील शक्तीशी हातमिळवणी करतात. स्त्री देहाचाही मोह होतोच की. हनी ट्रॅप म्हणतात त्याला. पण आपण कशात अडकायचे हे आपणच ठरवतो की.

जनाचा प्रवाहो चालला असे असले तरी प्रवाहाविरुध्द पोहणारेही विरळाच का होईना माणसे असतातच की. आपल्याला काय हवे, कोणत्या पध्दतीने ते मिळवायचे आहे, हे एकदा ठरले की झाले तर मग. आपल्या आयुष्यात कोणती मोहमयी वळणे येतील याचा विचार करायला हवा. मी अशुध्द बोलणार नाही. त्या वाटेला जाणार नाही असे निश्चित केले की झाले. नाहीतर ही वाट दूर जाते खड्ड्यामधील गावा. पण आपल्याला तेथे जायचे आहे का की गुळगुळीत डांबरी सडकेने मार्गक्रमण करायचे कोणता मार्ग सुखकर होईल याची शहानिशा करता आली पाहिजे नाहीतर दुनिया खड्ड्यात जाते म्हणून आपणही तेच करायचे का. धोक्याची वळणे टाळून यश संपादन करता येतेच की. त्यासाठी मात्र आपणच पाऊल उचलायचे.

***

# मन वढाय वढाय

मन ही देवानी माणसाला दिलेली एक अद्भूत देणगीच म्हणता येईल ना, माणसाच मन कशाही प्रकारे मोडता येते म्हणजे वळविता येते तरीही आपण म्हणतो की एखादी गोष्ट विसरता येत नाही किंवा स्वभावाला औषध नाही हे सर्रास चूक आहे असं मला वाटतं. माणसाचं मन पाहिजे तसं वागू शकतं.



आपल्या मनानी जे ठरवलं ते होऊ शकते त्याला काहीही अशक्य नाही हे कितीतरी अनुभवातून सिद्ध झाले आहे, मी त्याला कधीच विसरू शकत नाही, मी त्याच्याशिवाय राहूच शकत नाही, मी त्याचे सर्वस्व आहे किंवा तो माझे सर्वस्व आहे, माझ्यामुळेच हे शक्य झाले, त्याच्या शिवाय हे अशक्य आहे असं काहीच नसतं, फक्त आपण आणि आपलं मन हेच आपलं असतं बाकी कुणीच कुणाचं नसतं सर्व आपल्या मनाचे भ्रम असतात. त्यामुळे इथे पृथ्वीवर कशातच अडकून रहाण्यात अर्थ नाही, मनाला जे योग्य वाटेल ते करत रहावे, मन नेहमी था-यावर ठेवावे, मनात ऊगीचच काहीही उलट-सुलट विचार आणत जावू नयेत. आपले मन कधीच खोटे बोलत नाही ते आपल्याला चांगले ओळखत असते त्यामुळे आपल्या मनाचे नेहमी ऐकत जावे, दुस-याच्या मनात ढवळाढवळ करत बसू नये, आपल्याला पडणा-या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर सर्वात प्रथम आपले मनच देत असतं त्यामुळे त्यावर सर्वात जास्त विश्वास आपण ठेवायला पाहिजे.



संजय व्यापारी,
पुणे

मनाची व्याख्या सर्वात सुंदर बहिणाबाईने त्यांच्या मन वढाय वढाय या कवितेतून सांगीतली आहे.

मन वढाय वढाय

मन वढाय वढाय, उभ्या पीकातलं ढोर ।
किती हाकला हाकला, फिरी येतं पिकांवर ।।
मन मोकाट मोकाट, त्याले ठायी ठायी वाटा । जशा वाऱ्यानं चालल्या, पानावर्हल्यारे लाटा ।।
मन लहरी लहरी, त्याले हाती धरे कोन? ।
उंडारलं उंडारलं जसं वारा वाहादन ।।
मन जह्यरी जह्यरी, याचं न्यारं रे तंतर ।
आरे इचू साप बरा, त्याले उतारे मंतर ।।
मन पाखरू पाखरू, त्याची काय सांगू मात?। आता व्हतं भुईवर, गेलं गेलं आभायात ।।
मन चप्पय चप्पय, त्याले नही जरा धीर ।
तठे व्हयीसनी ईज, आलं आलं धर्तीवर ।।
मन एवढं एवढं, जसा खाकसचा दाना ।
मन केवढं केवढं? आभायात बी मायेना ।।
देवा, कसं देलं मन आसं नही दुनियात । आसा कसा रे तू योगी काय तुझी करामत ।। देवा, आसं कसं मन? आसं कसं रे घडलं । कुठे जागेपनी तूले असं सपनं पडलं ।।

कवयित्री बहिणाबाई चौधरी

खरंच माणसाचं मन ही जादूची पेटीच आहे असं मला वाटतं, तुम्हीपण याचा अनुभव घेतच असाल.

## गमतीदार किस्से

# रागावलेले प्राणी

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आज एक मुंगीची इमेज बघितली आपल्या गुगल बाबांची कृपा! आणि ती इमेज बघून एकदम घाबरलेच. आपली साधी घरात वावरणारी वेळेला आपल्या कपड्यांवर,अंगावर फिरणारी हीच ती मुंगी का? असा प्रश्न पडावा आणि भीती वाटावी असा तिचा चेहरा दिसत होता. एक विचार असा आला की देव मुंगी ( आपली गुदगुल्या करणारी काळी मुंगी ) आपल्याला चावत नाही. आपणच बरेचदा तिला त्रास देतो. म्हणूनच या लाल मुंग्यांना राग येत असावा आणि स्वत:ला मिळणारी वागणूक आणि काळ्या मुंगीला मिळणारी वागणूक हे दोन्ही मिळून ती एवढी रागीट चेहेऱ्याने आपल्याला कडकडून चावत असावी.

असेच सकाळी सकाळी म्हणजे साखर झोपेत असताना कोंबडा इतका कर्कश्श का ओरडत असावा? आमच्या शेजारच्या घरातील कोंबडा तर घड्याळाच्या दर तासाला नियमित पडणाऱ्या ठोक्या प्रमाणे दर तासाला आरवतो. बहुतेक दिवसभर त्याला माणसांच्या आवाजाचा जो त्रास होतो त्याचे उट्टे काढत असावा.



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

तीच गोष्ट कुत्र्यांची. कितीही लक्ष ठेवा आपला डोळा चुकवून आपण कंबर मोडून स्वच्छ केलेल्या दरवाजावर व त्या समोरील स्वच्छतेवर घाण करून जाणार. अनेक उपाय केले पण कुत्र्यांना आमच्या घरा समोरची जागा फारच आवडली होती. जणू मला चिडवायचे ठरवूनच टाकले होते. मग मी गुगल साहेबांची मदत घेऊन उपाय शोधले आणि उग्र वासाच्या फिनाईलची मदत घेतली. त्याचा कुत्र्यांना एवढा राग आला की त्यांनी रात्रभर निरनिराळ्या आवाजात ( प्रत्येक कुत्र्याचा आवाज वेगळाच असतो म्हणा ) ओरडून माझ्या झोपेवर घाला घातला. असेही वाचनात आले होते की, लाल व निळ्या रंगाचे पाणी भरून बाटलीत ठेवले तर कुत्री, मांजरे यांचा त्रास होत नाही. मग मी पण तो उपाय केला. पण बाटल्या गायब होऊ लागल्या. शोध घेण्यासाठी खूप प्रयत्न केले. त्यावेळी त्यातील एक बाटली चक्क कुत्र्याच्याच तोंडात बघितली. आणि या रंगीत पाण्याच्या बाटल्या कोण पळवत आहे याचे उत्तर मिळाले.

आमच्या काकांच्या घरी एक लाडाची मांजर होती. कोणी आणले नव्हते. तीच आपणहून आली होती. आणि बळेच सगळ्यांच्या पायात येऊन लाड करून घ्यायची. आम्ही कॅरम खेळायला बसल्यावर तिला खूप राग यायचा. ती त्या बोर्ड वर बराच वेळ बसायची. सोंगट्यांचे बराच वेळ निरीक्षण करायची आणि रागाने आपण स्वतःच सर्व सोंगट्या बिळात पंजाने ढकलून द्यायची. ती इतकी शहाणी होती की एखादा पदार्थ आवडला नाही तर पळून जायची. आणि जबरदस्तीने दिला तर जीभ बाहेर काढून उलटी आल्या सारखे करायची आणि तो पदार्थ देणाऱ्याला पंजाचा प्रसाद द्यायची.



अशीच एकदा आपण जिला गरीब समजतो अशा शेळीची गंमत कसली, रागच बघितला होता. एका शेळीला एक व्रात्य मुलगा शेपटीला हात लावून,ओढून सारखा त्रास देत होता. चार पाच वेळा ती पुढे पळाली. नंतर मात्र ती त्या मुलाकडे वळली आणि त्याला आपल्या छोट्या शिंगाने मारले. जणू तिने अन्यायाचा प्रतिकार करा हीच शिकवण दिली.

अशा काही थोड्या गमती,काही राग सहज ओरडणाऱ्या कोंबड्या मुळे आठवले. तशा प्राण्यांच्या बऱ्याच आठवणी,अनुभव व गमती जमती आहेत. त्या पुन्हा केव्हातरी.




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559